VOL- IX | ISSUE- VII | JULY | 2022 | PEER REVIEW e-JOURNAL | IMPACT FACTOR 7.331 | ISSN 2349-638x

# पूर्व विदर्भातील "खुर्शिपार गावातील" अनुसूचीत जमातीचा चिकीत्सक अभ्यास

डॉ.अमित गायधनी
प्राध्यापक,विदर्भ कला,वाणिज्य महाविद्यालय,
लाखनी जि.भंडारा
E-mail:-amitgaidhani@gmail.com

प्रस्तावना :-

देशाचा विकास करित असतांना शहरा सोबतच खेडे गावाचा अभ्यास करणे आवश्यक आहे कारण देशातील लोकांच्या मुलभूत गरजेपैकी अन्नधान्याचा प्रश्न मिटविण्यासाठी खेडेगावातील शेती व शेती करणा-या शेतक-यांचा अभ्यास करणें आवश्यक आहे त्याच्या समाजिक व आर्थिक समस्यांचा आढावा व निराकरण करण्यासाठी यांच्याशी निगडीत घटकांचे सर्वेक्षण भूगोल विषयामध्ये करण्यात येते . भारतीय समाज रचनेत अनुसूचित जाती ,जमाती ,भटक्या जाती व इतर मागासवर्गीय व सवर्ण या पाचही घटकापैकी कोणताही एक घटक दुर्लक्षित झाल्यास देशाचा सपूर्ण विकास झाला असे म्हणता येणार नाही यासाठी आपण पूर्व विदर्भातील सीमेवरील एका गावाचे सर्वेक्षण करून मिळालेल्या माहिती वरून शासकीय सोईसुविधाचा किती प्रमाणात ग्रामीण भागातील लोकांना फायदा झाला याचे अध्ययन करण्याचा प्रयत्न केला आहे.. लाखनी तालुक्यातील खुर्शिपार या गावाची निवड करण्यात आली.

संशोधन माहिती संकलन स्त्रोत :-

सर्वेक्षण पूर्ण करण्यासाठी प्रश्नावली तयार करून आम्ही ०४/०१/२०२२ ला खुर्शिपार या गावाचे सर्वेक्षण करण्यासाठी आम्ही सकाळी ८.०० वाजता या गावाला भेट दिली.

सर्वेक्षण पूर्ण करण्यासाठी प्रश्नावली तयार करून प्रत्यक्ष मुलाखत पद्धतीने कुटुंबाच्या आर्थिक व सामाजिक परिस्थिती विषयी माहिती मिळविली आहे. यासाठी तीन तीन विद्यार्थ्यांचा गट करून गावातील कुटुंबात जावून मुलाखत घेण्यात आली. तसेच परिणाम करून व प्रश्न विचारून सर्वेक्षण करण्यात आले. यानंतर सर्वेक्षण करून सर्व प्रश्नावली एकत्रित करून मिळालेल्या माहितीचे सादरीकरण वर्गीकरण करण्यात आले.माहिती एकत्रित करतांना ग्रामपंचायत दस्ताऐवज शासकीय प्रकाशित माहिती, भारतीय जनगनना भंडारा जिल्हा २०११, तहसिल कार्यालय लाखनी येथील महसूल कार्यालयातील नकाशे , एम एस इ बी . येथील प्राप्त माहितीच्या आधारावर प्रस्तुत अहवाल तयार करण्यात आले.

परीकल्पना :- शासकीय सोईसुविधेचा खेडेगावापर्यंत लाभ पोहचत नाही

सर्वेक्षणाचा उद्देश :-

भूगोल विषयाची व्याप्ती जशी जशी वाढत गेली तेव्हा भूगोलाची व्याख्या सुद्धा बद्लत गेल्या असे म्हटले जाते. भूगोल हे क्षेत्रिय अध्ययनाचे शास्त्र आहे. त्यामुळे या क्षेत्रातील भूमी उपाययोजनाची सांस्कृतिक व आर्थिक घटकांच्या विकास कसा होत आहे . हे पाहणे अगत्याचे ठरले.

वरील उद्देश पूर्ण करण्यासाठी नागपूर विद्यापीठ बी.ए.भाग ३ च्या भूगोल प्रात्याक्षिक

अभ्यासक्रमानुसार एखादया गावाची निवड करून आर्थिक तसेच सामाजिक घटकांचा कसा परिणाम झालेला आहे. हे अभ्यासने हा या सर्वेक्षणाचा प्रमुख उद्देश आहे.

संशोधन सर्वेक्षण स्थान :-

महाराष्ट्राच्या ईशान्य सिमेवरील भंडारा जिल्हातील लाखनी तालुक्यामध्ये खुर्शिपार हे ठिकाण लाखनी वरून दक्षिणकडे सिपेवाडा कडे जाताना १७ कि.मी अंतरावर आहे.

संशोधन सुचक शब्द :- भौगोलिक हवामान , शेतक-याची सामाजिक सरंचना व आर्थिक परिस्थिती , शासकीय सोईसुविधेचे लाभार्थी

कामाचे स्वरूप व कालावधी :-

सर्वेक्षण पूर्ण करण्यासाठी प्रश्नावली तयार करून आम्ही ०४/०१/२०२२ ला खुर्शिपार या गावाचे सर्वेक्षण करण्यासाठी आम्ही सकाळी ८.०० वाजता या गावाला भेट दिली.

सर्वेक्षण पूर्ण करण्यासाठी प्रश्नावली तयार करून प्रत्यक्ष मुलाखत पद्धतीने कुटुंबाच्या आर्थिक व सामाजिक परिस्थिती विषयी माहिती मिळविली आहे. यासाठी तीन तीन विद्यार्थ्यांचा गट करून गावातील कुटुंबात जावून मुलाखत घेण्यात आली. तसेच परिणाम करून व प्रश्नविचारून सर्वेक्षण करण्यात आले. यानंतर सर्वेक्षण करून मिळालेल्या माहितीचे सादरीकरण वर्गीकरण करण्यात आले. सर्व प्रश्नावली एकत्रित करून मिळालेल्या आकडेवारीचे वर्गीकरणाच्या आधारावर प्रस्तुत अहवाल तयार करण्यात आले.

हवामान:-

संशोधन स्थळाचे हवामान उष्ण असून किमान तापमान ७ अंश व कमाल तापमान ४७ अंश पर्यंत असते. साधारणता भंडारा जिल्हायापासून समुद्र ९०० कि.मि. अंतरावर असल्याने वातावरण उष्ण व विषम स्वरूपाचे असल्याचे दिसून येते.त्यामुळेच येथील वनस्पती पाणझडी स्वरूपाची आहे.

पर्जन्यमान :-

भंडारा जिल्हयातील पर्जन्य १३०० ते १४०० मि.मि. पर्यंत होत असल्याने या भागात पावसाळा हा अतिवृष्टीचा असतो. त्यामुळे या भागात धान,उस, यासारखे पिक घेतले जाते.

मृदा :-

भंडारा जिल्हायातील मृदा अग्निजन्य खडका पासून तयार झाल्याने काही प्रमाणात लाल रंगाची आहे. येथील मृदा पोयटयाची असल्याने अधिक काळा पर्यंत पाणि धरून ठेवण्याची क्षमता असते. तसेच येथील वातावरण व जमिन भात शेती साठी आदर्श मानली जाते.

आर्थिक संरचना :-

अ) व्यवसाय :-

मानवाचे आर्थिक व्यवसाय पर्यावरणाशी निगडीत असले तरी बहुतेक आर्थिक क्रिया मानवाच्या शैक्षणिक व आर्थिक स्थितीवर अवलबूंन असतात. खुर्शिपार या गावात प्रामुख्याने प्राथमिक व्यवसायात गुंतलेल्या कुंटुबाची संख्या अत्याधिक असून मजूरी करणा-यांची संख्या कमी आहे. शेतीसोबतच येथील लोक पशुपालन सुद्धा करतात.

खुर्शिपार आर्थिक संरचना सर्वेक्षण वर्ष २०२१-२०२२

| अ क | व्यवसायाचे स्वरूप | कुटुंब संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | शेती | ३९ | ५७.३५ |
| २ | मजुरी | २९ | ४२.६५ |

स्त्रोत :- प्रत्यक्ष सर्वेक्षणातून घेतलेली आकडेवारी (सर्वेक्षण वर्ष २०२१-२०२२)

वर दिलेल्या आकडेवारीचे विवेचन केल्यास असे दिसून येते की, शेती व्यवसायात गुंतलेल्या कुटुंबाची संख्या अधिक आहे. म्हणजेच ६७.३५ टक्के असून त्यांचे मुख्य कारण म्हणजे प्रत्येक कुटुंबाची वडिलोपार्जित जमीन असून या

जामिनीचा उपयोग उदरनिर्वाहाचे साधन म्हणून केला जातो. म्हणजेच त्याचप्रमाणे काही कुटुंबाकडे थोडया प्रमाणात जमीन आहे. पण त्याचे त्यावर उदरनिर्वाह होवू शकत नाही. म्हणून लाकुडतोड ,चटई,टोपले ,झाडू बनविण्याची कामे ते करीत असतात. वरील सर्वेक्षणानुसार ४२.६५ टक्के लोकांकडे शेती नाही त्यामुळे ते लोक मजुरी व पशुपालन व इतरही कामे करतात. व कुटुंबाचा उदरनिर्वाह करतात. हिवाळयात पाण्याची सोय असलेले शेतकरी गहू, हरबरा, सारखे रब्बी पीक घेतात.

ब) सामाजिक संरचना :-

वय व लिंग संरचना सर्वेक्षण वर्ष २०२१-२०२२

| अ क | वयोगट | पुरूष | स्त्री | एकूण | टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| १ | ० ते १५ | ३७ | ४० | ७७ | ३१.४२ |
| २ | १६ ते ४० | ६१ | २८ | ८९ | ३६.३२ |
| ३ | ४१ त `६० | ३८ | ३० | ६८ | २७.७६ |
| ४ | ६० पेक्षा जास्त | ४ | ७ | ११ | ४.४९ |
| | | १४० | १०५ | २४५ | १०० |

स्त्रोत :- प्रत्यक्ष सर्वेक्षणातून घेतलेली आकडेवारी (सर्वेक्षण वर्ष २०२१-२०२२)

वरील टक्केवारीच्या निरीक्षणावरून स्पष्ट होते. की खुर्शिपार या गावची एकूण लोकसंख्या २४५ असून त्यात १४० पुरूष व १०५ स्त्रीया आहेत. ० ते १५ वयोगटातील लोकसंख्येची टक्केवारी ३१.४२ असून स्त्रियांची संख्या पुरूषापेक्षा थोडी जास्त आहे.

१६ ते ४० वयोगटातील लोकसंख्येची टक्केवारी ३६.३२ या वयोगटातील टक्केवारी सर्वात जास्त असून या वयोगटातील स्त्रियांची संख्या पुरूषापेक्षा कमी आहे.

४१ ते ६० वयोगटातील टक्केवारी २७.७६ असून या वयोगटातील पुरूषांनी संख्या स्त्रियांच्या प्रमाणात अधिक आहे. ६० च्या वरील वयोगटातील लोकसंख्येची टक्केवारी ४.४९ असून यामध्ये पुरूषाचे प्रमाण स्त्रियांच्या तुलनेत कमी आहेत.

क) साक्षरता प्रमाण

साक्षर लोकांची समजण्याची क्षमता निरक्षर लोकांपेक्षा अधिक समजल्या जाते. या साक्षरतेचा परिणाम राहणीमान व आर्थिक परिस्थितीवर होत असतो. सर्वेक्षणात प्राप्त झालेल्या आकडेवारीवरून पुढील सारणी तक्ता तयार केली आहे.

खुर्शिपार गावातील शैक्षणिक वितरण (सर्वेक्षण वर्ष २०२१-२०२२)

| अ क | शिक्षण | पुरूष | स्त्री | एकूण | टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| १ | निरक्षर | ८ | १२ | २० | ८.६२ |
| २ | प्राथमिक | ४४ | ४१ | ८५ | ३६.६३ |
| ३ | माध्यमिक | ३२ | ३२ | ६४ | २७.५ |
| ४ | कनिष्ठ महाविद्यालय | ३३ | २१ | ५४ | २३.२७ |
| ५ | महाविघालय | २ | २ | ४ | १.७२ |
| ६ | पदव्युत्तर | ३ | २ | ५ | २.१५ |
| | एकूण | १२२ | ११० | २३२ | १०० |

स्त्रोत :- प्रत्यक्ष सर्वेक्षणातून घेतलेली आकडेवारी (सर्वेक्षण वर्ष २०२१-२०२२)

वरील आकडेवारीवरून स्पष्ट होते की, एकूण लोकसंख्येपैकी प्राथमिक शिक्षण घेणा-याची संख्या जास्त आहे. प्राथमिक शिक्षण घेण्या-यांचे प्रमाण ३६.६३ टक्के असून माध्यमिक शिक्षण घेण्या-याचे प्रमाण २७.५ टक्के आहे. कनिष्ठ महाविद्यालय मध्ये शिक्षण घेणा-यांचे प्रमाण २३. २७ , महाविद्यालयनी शिक्षण घेणा-यांचे प्रमाण १. ७२ पदव्युत्तर शिक्षण घेणा-याचे प्रमाण २.१५ आहे. निरक्षरांचे प्रमाण ८.६२ टक्के आहे. प्रत्यक्ष

सर्वेक्षण केल्यानंतर असे लक्षात आले की, या गावामध्ये शिक्षितांची संख्या मोठया प्रमाणात आहे.

ड) जात संरचना :-

प्रत्येक सर्वेक्षणात आधारावर मिळालेल्या आकडेवारी नुसार असे लक्षात आले की, खुर्शिपार या गावात ओ.बी.सी (कुणबी) व इतर मागासवर्गीयांचे प्रमाण जास्त प्रमाणात आढळले आहे

| अ.क्र | जात | कुटुंब संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | गोंड | १५ | ५३.५७ |
| २ | ओ.बी.सी | १३ | ४६.४३ |
| एकूण | | २८ | १०० |

स्त्रोत :- प्रत्यक्ष सर्वेक्षणातून घेतलेली आकडेवारी (सर्वेक्षण वर्ष २०२१-२०२२)

वरील तक्यावरून असे स्पष्ट होत की, या गावात फक्त २ जातीचे लोक राहतात. तसेच या गावात गोंड लोक सर्वात अधिक म्हणजे ५३.५७ टक्के आहेत. तर कुणबी जातीचे लोक ४६.४३ टक्के आहेत.

इ) वस्ती संरचना :-

प्रत्येक सर्वेक्षणातुन मिळालेल्या आकडेवारीवरून पुढील सारणी तयार केली आहे.

खुर्शिपार गावातील घरांची संरचना ( सर्वेक्षण वर्ष २०२१-२०२२)

| अ क | घराचा प्रकार | एकूण | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | मातीचे घर | ५२ | ७६.४७ |
| २ | विटांचे घर | १६ | २३.५३ |

स्त्रोत :- प्रत्यक्ष सर्वेक्षणातून घेतलेली आकडेवारी (सर्वेक्षण वर्ष २०२१-२०२२)

वरील सारणीवरून स्पष्ट होते की, मातीच्या घरांची संख्या या गावात जास्त असून विटांच्या घराचे प्रमाण २३.५३ टक्के आहेत. येथील गावक-यांच्या राहणीमानाचा दर्जात सुधारणा झालेली आहे.

ई) कुटुंब नियोजन जनजागृतीची माहिती :-

सर्वेक्षणाच्या आधारावर प्राप्त झालेल्या आकडेवारीकरून पुढील सारणी तयार केलेली आहे.

खुर्शिपार गावातील कुटुंब नियोजन जनजागृतीची माहिती (सर्वेक्षण वर्ष २०२१-२०२२)

| अ क | कुटुंब नियोजन | पुरूष | स्त्री | न केलेली | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| १ | केलेली | १४ | ३५ | १९ | ६८ |
| २ | टक्केवारी | २०.५९ | ५१.४७ | २७.९४ | १०० |

स्त्रोत :- प्रत्यक्ष सर्वेक्षणातून घेतलेली आकडेवारी (सर्वेक्षण वर्ष २०२१-२०२२)

वाढत्या लोकसंख्येसाठी शासनाने लोकांमध्ये केलेल्या जनजागृतीसाठी साक्षरता, वैदयकीय सुविधा यांचा लाभ फक्त ७२.०६ टक्के लोकांनी घेतला आहे. तर २७.९४ टक्के लोक अजूनही वाढत्या लोकसंख्येच्या बिकट परिस्थितीतून जात आहेत. यासाठी शासनाला शहरापासून खेडयापर्यत शिक्षणासोबतच शैक्षणिक सुविधा पुरविणे आवश्यक आहे.

फ) शासकीय सोईसुविधा

१) कृषी, विघुत पंपाचा लाभ घेणारे शेतकरी (सर्वेक्षण वर्ष २०२१-२०२२)

| अ. क्र | जात | लाभ घेणारे शेतकरी | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | ओ.बी.सी | ०३ | ७.६९ |
| २ | अनु.जमाती | ०१ | २.५६ |
| ३ | भटक्या जमाती | ०३ | ७.६९ |
| ४ | विघुत कनेक्शन नसलेले | ३२ | ८२.०६ |
| | एकूण | ३९ | १०० |

शासनाने लोकांसाठी स्वस्त शेतीसाठी विघुत पुरवठा करून शेतक-यांची आर्थिक परिस्थिती सुधारण्यासाठी करित असले तरी आजही या योजनेचा लाभ फक्त १७.९४ लोकांनी घेतला आहे. तरी ८२.०६ टक्के लोक अजूनही या सुविधेपासून वंचित आहेत. यांना शासकीय योजनेच्या लाभार्थींना मध्ये आणण्यासाठी शासनाला शहरापासून खेडयापर्यंत लोक प्रतिनिधी व शासकीय कार्यालय यांच्याशी मेळ घालणा-या व्यक्तीची नियुक्ती कृषी अधिका-यांने कत्रांटी तत्वावर करण्याची आवश्यक आहे.जेणेकरून कृषी उत्पदानात वाढ होऊन शेतक-यांची आर्थिक परिस्थिती सुधारते.

२) शासकीय आवास योजना :-

खुर्शिपार गावातील घरकुल योजने अंतर्गत लाभार्थी (सर्वेक्षण वर्ष २०२१-२०२२)

| अ.क्र | जात | लाभार्थी | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | अनु.जमाती | ३९ | ३३.९१ |
| | एकूण | ११५ | १०० |

शासनाने लोकांसाठी मोफत घरकुल योजने अंतर्गत मुलभूत गरजेची पुर्तेता करण्यासाठी ही योजना सुरू केली. तरी सुध्दा या योजनेचा लाभ फक्त ३९ लोकांनी घेतला आहे. तरी अजूनही काही लोक या सुविधेपासून वंचित आहेत. यांना शासकीय योजनेच्या लाभार्थ्यांन मध्ये आणण्यासाठी शासनाला लोक प्रतिनिधी व शासकीय कार्यालय यांच्याशी मेळ घालणा-या व्यक्तीची नियुक्ती ग्रामपंचायतच्या अधिकारात कत्रांटी तत्वावर करण्याची आवश्यक आहे.जेणेकरून शासकीय आवास योजनेतुन कोणातीही गरजु व्यक्ती या योजनेपासन दुर्लक्षित राहू नये व गावातील घरकुल संबंधितीत प्रश्न सुटण्यास मदत होईल.

निष्कर्ष :-

भंडारा जिल्हातील लाखनी तालुक्यातील आदिवाशी , दुर्लक्षित , कमी लोकसंख्या असलेल्या गावातील सोईसुविधेचा अध्ययन करून समाज परिवर्तनाच्या दृष्टिकोनातुन शासनाच्या नियोजनात हे गाव आणण्याच्या दृष्टीकोनातून खुर्शिपार गावाची निवड करून येथील लोकसंख्या ही आदिवासी लोकांची अधिक असून येथील हवामान उष्ण व विषम आहे . पर्जन्य १३०० मी. मी. ते १४०० मी.मी पर्यंत होते. येथील मृदा पोयटयाची असून तांबुस रंगाची आहे. एकंदरित येथील हवामान भात शेतीसाठी आदर्श आहे. या गावामध्ये बहुतांस लोक शेती व्यवसायात गुंतलेले असून शेत मजूरी व शेती निगडीत व पुरक उदा. कुक्कुटपालन, शेळीपालन, मवेशीपालन , मासेमारी व जंगली क्षेत्रात लाकुडतोड, लाख,डिंक , मध गोळा करणे इत्यादी व्यवसायच्या माध्यमातून उदरनिर्वाह करीत असतात. अनुसुचित जमातीच्या लोकांचा राहणीमानाचा स्तर व शासकीय योजनेपासून अजूनही किती प्रमाणात लोक वंचित आहेत याची अध्ययन करण्यासाठी खुर्शिपार या गावाचे सामाजिक, आर्थीक सर्वेक्षण केले असता असे आढळून आले की, जवळपास सर्वच लोक साक्षर असून फक्त ८.६२ टक्के निरक्षर आहेत वाढत्या लोकसंख्येसाठी शासनाने लोकांमध्ये केलेल्या जनजागृतीसाठी साक्षरता, वैदयकीय सुविधा यांचा लाभ फक्त ७२.६ टक्के लोकांनी घेतला आहे. तर २७.९४ टक्के लोक अजूनही वाढत्या लोकसंख्येच्या बिकट परिस्थितीतून जात आहेत.. गावातील स्त्रियांचे लिग गुणोत्तर पुरूषांच्या तुलनेत थोडे कमी आहे. व आदिवासी समुदायाचे प्रमाण ५३.५७ टक्के असून आजही या गावामध्ये शासकीय योजनेतून निवासी योजनेचा लाभ ३३.९१ टक्के लोकांना घेता आला नाही. मात्र वैद्यकीय सोईसुविधेच्या लाभ घेण्याचे प्रमाण ८६ टक्के इतका आहे.

उपाययोजना :-

शासनाला शहरापासून खेडयापर्यंत शिक्षणासोबतच अजूनही या अनुसुचित जाती

जमातीच्या लोकांसाठी शासनाने विविध योजनेच्या माध्यमातून त्याचा वैद्यकीय व राहणीमानाचा स्थर वाढविण्यासाठी शासकीय सुविधा पुरविणे आवश्यक आहे

संदर्भसूची :-

१. भारतीय जनगनना पुस्तिका :भंडारा जिल्हा २०११
२. महसुल कार्यालय लाखनी तालुका प्रकाशने
३. ग्रामपंचायत कार्यालय आलेसुर आदर्श तक्ता
४. एमएसइबी कार्यालय लाखनी प्रकाशने